# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०२५ /२०१०

अर्जदार : श्री पुंडलिक महादेव शिंगाडे
राहणार प्लॉट नं. 499, राजग्रह
म.न.पा. दवाखान्या जवळ,
बेझनबाग,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री डी. जी. गावनार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. ०९.०४.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक ०५.०३.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

1) अर्जदाराने सदर तक्रार अर्ज त्याला विद्युत देयके अवास्तव येण्याबाबत केली आहे. अर्जदाराला मे, जुन व जुलै 2009 या कालावधीत अवास्तव बिल देण्यात आले व तक्रार करूनही त्याचे म्हणणे ऐकुण घेण्यात आले नाही.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे दि. २२.०३.२०१० रोजी दाखल केलेले आहे. गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की तक्रारकर्त्याचे बिल मे ते जुलै 2009 विज बिल वगळता उर्वरीत बिज बिल जवळजवळ सारखेच आहे. तक्रार कर्त्याच्या मे 2008 ते जुलै 2008 याचा सरासरी प्रमाणे माहे मे 2009 ते जुलै 2009 या कालाखंडाकरीता दुरूस्त करण्यात आलेला आहे. तसेच विज आकारणी, डी.पी.सी. व व्याज अशी रक्कम वजा करून बिल देण्यात आलेले आहे.

गैरअर्जदाराने केलेल्या समायोजनाचा तक्ता आपल्या उत्तराबरोबर दाखल केलेला आहे. रेकार्ड वरील कागदपत्रे व गैरअर्जदाराने केलेल्या समायोजनाचा तपशील पाहिल्यावर गैरअर्जदाराचे म्हणणे बरोबर आहे असे दिसुन येते.

गैरअर्जदाराने नियमा प्रमाणे विद्युत बिल आकारणी केलेली आहे हया व्यतिरिक्त तक्रार कर्त्यास कोणतीही सुट मिळु शकत नाही, गैरअर्जदाराने दिलेले 1448.82/– रूपयाचे बिल वाजवी व नियमाप्रमाणे असल्यामुळे तक्रार कर्त्याची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

| सही/– | सही/– | सही/– |
| --- | --- | --- |
| (डी.जी. गावनार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.